सकाळ TODAY

शनिवार, १७ ऑगस्ट २०२४ | पुणे | SakalNews | SakalMediaNews | www.esakal.com

# पवार, विद्यानिकेतन, अमनोरा स्कूलची प्रतिस्पर्ध्यांवर मात

## शालेय फुटबॉल स्पर्धा

**पुणे, ता. १६ :** शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित शालेय फुटबॉल स्पर्धेत सतरा वर्षांखालील मुलांच्या गटात पवार पब्लिक स्कूल, विद्यानिकेतन, ग्लोबल इंडियन नॅशनल, अमनोरा स्कूलने प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळविले.

बीएमसीसीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत समृद्ध गायकवाड (५ वे मिनीट), आहान सूर्यवंशीने (१७ वे मिनीट) केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर नांदेड सिटीच्या पवार पब्लिक स्कूलने मुक्तांगण स्कूलवर २-० असा विजय नोंदवला.

अथर्व झिरमिलेने खेळाच्या २५ व्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर बिबवेवाडीच्या जे. पी. ट्रस्टच्या विद्यानिकेतन स्कूलने खडकीच्या ऑल सेंट्स स्कूलवर मात केली. समर्थ मोहकरने खेळाच्या पाचव्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर आर. एम. डी. सिंहगड स्प्रिंगडेल स्कूलने निर्मला कॉन्व्हेंट स्कूलवर मात केली.

हडपसरच्या ग्लोबल इंडियन नॅशनल स्कूलने एस.एस.पी.एम.एस. डे प्रशालेवर टायब्रेकरअखेर ३-१ ने विजय प्राप्त केला. या सामन्यात निर्धारित वेळेत दोन्ही संघांतील खेळाडूंनी तोडीस तोड खेळ केला. अखेरीस निर्धारित वेळ गोलशून्य बरोबरीत सुटली. त्यामुळे टायब्रेकचा अवलंब करण्यात आला. टायब्रेकमध्ये ग्लोबल इंडियन नॅशनलच्या ऋग्वेद राजपूत वगळता निपुण इनामदार, स्पर्श कुंजीर, अर्णव राजोल यांनी गोल नोंदवले, तर 'एसएसपीएमएस'कडून साई डेरे यालाच गोल नोंदवता आला त्यांचे रूद्र शिंदे, पृथ्वागात जाधव व शौर्य भिवरे गोल करण्यात अपयशी ठरले.

अंश भस्मे (१९ वे मिनीट), ओम महाजन (२२ वे मिनीट) व रेयांशसिंहने (२९ वे मिनीट) केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर अमनोरा स्कूलने बालशिक्षण मंदिर स्कूलवर ३-० असा पराभव केला.

ओंकार कोंडगुळे (९ वे मिनीट) व नरेंद्र चौधरीने (१८ वे मिनीट) केलेल्या प्रत्येकी एक गोलच्या जोरावर हडपसरच्या एंजल मिकी मिनी स्कूलने येरवड्याच्या एस. एन. बी. पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज संघावर २-० असा विजय नोंदवला.

नमन लोढाने खेळाच्या दहाव्या मिनिटास केलेल्या गोलच्या जोरावर सातारारोडच्या सिटी इंन्टरनॅशनलने ॲग्लो उर्दू बॉईज स्कूलचा पराभव केला. शॉन दासने (९ व २० वे मिनीट) दोन व आयुष महाडिकने (२ रे मिनीट) केलेल्या एक गोलच्या जोरावर स्टेला मारीस स्कूलने क्रिसेंट हायस्कूलचा ३-० असा पराभव केला.



**बीएमसीसी मैदान :** शालेय फुटबॉल स्पर्धेत सतरा वर्षांखालील मुलांच्या गटात अमनोरा स्कूल आणि बालशिक्षण मंदिर स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यातील एक चुरशीचा क्षण.